# प्रकरण पाचवे

## अभ्यासाचे सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी

### ५.१ प्रस्तावना :

दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, हुपरी ही शेतकरी सहकारी संघ मर्यादित, कोल्हापूर या संस्थेची हुपरी येथील उपशाखा आहे. विशेषत्वाने सांगता येण्यासारखी बाब म्हणजे या पध्दतीचा सहकारी क्षेत्रातील हा भारतातील पहिला खत कारखाना आहे. या खत कारखान्याचा अभ्यास करीत असताना खत कारखान्याच्या वीस वर्षांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला असून आकडेवारीच्या साहाय्याने ३०-६-१९८९ पर्यन्तचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. यात खत कारखान्याचे प्रतिवर्षाचे उत्पादन, विक्री, विक्री व्यवस्था, श्रेणीनुसार झालेले उत्पादन, कारखान्याला सततचा होणारा नफा यांचा विचार केला आहे. या प्रकरणात या खत कारखान्याचा जो गेल्या वीस वर्षांतील तपशील विचारात घेतला आहे यावरून निघालेले प्रत्येक प्रकरणाचे सर्वसाधारण निष्कर्ष विचारात घेतले जातील. हा अभ्यास करीत असताना संशोधकाला प्रकर्षाने जाणवलेल्या या अभ्यासाच्या ज्या मर्यादा आहेत त्याचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. सर्वात शेवटी कारखान्याच्या प्रगतीच्या दृष्टीने, व्यवस्थापनाच्या दृष्टीने नोकरवर्गाच्या वेतनाच्या भूमिकेतून किंवा अन्य बाबींच्या संदर्भात काही महत्वाच्या सूचना केल्या आहेत. थोडक्यात हे प्रकरण संपूर्ण अभ्यासाचा सारांश आहे.

### ५.२ प्रकरण १ चे मूल्यमापन :

या प्रकरणात प्रथम कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा उदय व विकास याची थोडक्यात माहिती दिली आहे. तक्ता क्र. १.१ पाहिल्यास कोल्हापूरातील सहकारी चळवळीची दिशा तसेच प्रगतीची वाटचाल लक्षात

३) १९६८-६९ ते १९८२-८३ या वर्षापर्यन्त कारखान्यामध्ये खतासाठी येणा-या उत्पादन खर्चाची आकडेवारी उपलब्ध झालेली नाही.

४) शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर मधील खत विभागाच्या मॅनेजर साहेबांची वेळ घेऊन मुलाखत मिळाली नाही. कारण त्यांना अचानक मिटींग व परगावी जावे लागले.

५) दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, रूकडी हा शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर यांची एक शाखा असल्यामुळे कारखान्यासाठी स्वतंत्र व्यवस्थापन नाही. तसेच स्वतंत्र वार्षिक अहवाल निघत नाही.

५.७ <u>शिफारशी</u> :

शेतकरी सहकारी संघ मर्यादित, कोल्हापूर यांची शाखा ' दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, रूकडी ' ही शाखा असून येथे खतांच्या विविध ग्रेडसचे उत्पादन केले जाते. १९६८-६९ ते १९८८-८९ या २० वर्षांच्या कालखंडातील कारखान्याच्या सर्वसाधारण प्रगतीचे मोजमाप करण्याचा प्रयत्न या अभ्यासात केला आहे. यात खत कारखान्यातील उत्पादन, विक्री, विक्री व्यवस्था, नफ्याची स्थिती अशा ठळक बाबींचा विचार केला. कारखान्याची संख्यात्मक प्रगती झालेली आहे ही बाब सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ व स्पष्ट आहे. त्यामुळे हा खत कारखाना प्रगतीपथावरील खत कारखाना म्हणून ओळखला जातो. पण तो अधिकाधिक प्रगत व्हावा आणि त्याची उत्कर्षाकडे वाटचाल व्हावी यासाठी काही महत्वाच्या सूचना या ठिकाणी अभ्यासकाने जर मांडल्या तर त्या अनाठायी होणार नाहीत. अर्थात अभ्यासकाच्या या सूचना किंवा मतप्रणाली त्याच्या कुवतीनुसार केलेल्या अभ्यासावरून मांडलेल्या आहेत. त्यामुळे त्याचा व्यवस्थापनाला उपयोग झाल्यास हा अभ्यास उपयुक्त झाला असे म्हणता येईल.

